ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 11 | JULY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# श्रमिक मुक्ती दल आणि महाराष्ट्राचे राजकारण

प्रा. डॉ. शिरीषकुमार धोंडीराम पवार
राज्यशास्त्र विभाग, बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,
ता. पाटण, जि. सातारा.

## १. प्रस्तावना : —



१९५० ते १९७० हा कालखंड व्यवस्था परिवर्तनाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. या कालखंडात आणि तिसऱ्या जगात अनेक चळवळी उदयाला आल्या. १९७० च्या दशकात महाराष्ट्रात समतावादी, क्रांतिकारी, पुरोगामी विचारांच्या अनेक चळवळींची कृतीशीलता दिसून येते. १९६७ मध्ये युवक क्रांती दलामार्फत शेतमजूरांना संघटित करण्याचे कार्य, धुळे जिल्ह्यत शहादे भागात मार्क्सवादी विचारांच्या तरुणांनी श्रमिक संघटनेद्वारे आदिवासी आणि शेतमजूरांच्या वेतनासाठी आंदोलन, ठाणे जिल्ह्यतील आदिवासी भागात आदिवासीसाठींचे गोदुताई परुळेकर व श्यामराव परुळेकर यांनी केलेले कार्य, तसेच जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन यांच्या रायगड जिल्ह्यतील सेझ विरोधातील लढा, तसेच पालघर जिल्ह्यत काळूराम दाभाडे या आदिवासी कार्यकर्त्याने भूमीसेना आंदोलनाद्वारे भूमिहिनांच्या जमिनदारांच्याकडून जमिनी परत मिळविण्यासाठी उभारलेले आंदोलन, तर डॉ. शरद पाटील यांनी महाराष्ट्रातील पहिली धरणग्रस्तांची चळवळ उकाई धरणाच्या निमित्ताने उभी केली. तसेच आदिवासी भूमिहिनांसाठी वनकायदा शासनाने पुढे आणला. त्यासाठीची न्यायालयीन लढाई सत्यशोधक कम्युनिष्ठ पक्षातर्फे लढण्यात आली. मेधा पाटकर यांचे नर्मदा बचाव आंदोलन, शरद जोशींची शेतकरी चळवळ, महाराष्ट्र राज्य धरण व शेतकरी परिषद, डॉ. भारत पाटणकर यांची धरणग्रस्त पुनर्वसन चळवळ (श्रमुद), समान पाणी वाटप चळवळ, पाणी संघर्ष समिती इ. चळवळींचे सामाजिक परिवर्तनामध्ये महत्वाचे योगदान असून त्या आजही मोठया प्रमाणात कार्य करीत आहेत. त्यात प्रामुख्याने श्रमिक मुक्ती दलाने उभारलेल्या चळवळींचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात केला आहे.

## २. उद्दिष्टे : —

१९७० नंतर महाराष्ट्रात उभा राहिलेल्या सामाजिक चळवळीमध्ये श्रमिक मुक्ती दलाने उभ्या केलेल्या पवनचक्कीग्रस्त शेतकरी, समन्यायी पाणी वाटप, धरणग्रस्त व विस्थापितांच्या चळवळीला महत्वाचे स्थान आहे. जमीन, पाणी व शेतकऱ्यांना घटनेने दिलेले मूलभूत हक्क यांना केंद्रस्थानी मानून त्यांचे प्रश्न सोडविणे हा प्रमुख हेतू या चळवळीचा होता. त्यासाठी धरणग्रस्त, विस्थापीत व पवनचक्कीग्रस्त शेतकऱ्याना संघटीत करून श्रमिक मुक्ती दलाने विविध आंदोलने उभारली. याच अनुषंगाने प्रस्तूत शोधनिबंधाची मांडणी करताना पुढील उद्दिष्टे ठरविली आहेत.

१. श्रमिक मुक्ती दलाची वैचारिक भूमिका अभ्यासणे.
२. श्रमिक मुक्ती दल व महाराष्ट्राचे राजकारण यांचा आढावा घेणे.

## ३. श्रमिक मुक्ती दलाचा उदय :

'मागोवा' ग्रुपची स्थापना १९७२—१९७३ मध्ये झाली. श्रमिक मुक्ती दलाचे लोक मागोवा ग्रुपमध्ये होते. त्यामध्ये अच्युत गोडबोले, सुधीर बेडेकर, सुहास परांजपे, कुमार शिराळकर (मार्क्सवादी), विश्वास काकडे यांचा समावेश होता. 'मागोवा' ग्रुपची जी विचारसरणी होती ज्याला पुर्णपणे नवमार्क्सवाद असे म्हटले गेले. पण ग्रुप मात्र स्वत:ला नवमार्क्सवादी मानत नव्हता. पण लोक म्हणत होते त्यातून मागोवाचे म्हणणे असे होते की, मार्क्सवादामध्ये बऱ्याच सुधारणा करण्याचा प्रयत्न झालेला आहे, त्यामध्ये तडजोडवादी भूमिका आलेली आहे. तिथे ट्रेड युनियन वाद, अर्थवाद आलेला आहे. खऱ्या अर्थाने जे मूलभूत बदल व्हायचे, मूलभूत परिवर्तनापासून लांब गेलेले कम्युनिष्ठ पक्ष, यासाठी मुळात मार्क्सवादाकडे गेले पाहिजे आणि मार्क्सवादाचा अभ्यास करुन जे भारताला योग्य आहे अशा पद्धतीने शांततेच्या मार्गाने पण संघर्षपूर्ण हा बदल घडवून आणला पाहिजे. जे सशस्त्र क्रांतीच्या बाजूने उभे राहत होते त्यांच्याशी या गटाचे मतभेद होते व जे प्रस्थापित कम्युनिष्ठ पक्षाच्या बाजूने उभे होते त्यांच्याशीही ग्रुपचे मतभेद होते. 'मागोवा ग्रुप' तसा मधलाच आहे. त्यातही काही तणाव होते कारण मार्क्सवाद हा जातीव्यवस्था व स्त्रीमुक्तीची नोंद घेत नाही. जातीव्यवस्था कशामुळे निर्माण झाली? आज तिचे महत्व काय? ती नष्ट करण्याला महत्व काय? हे प्रश्न त्यामधून सुटत नव्हते. तसेच इतर कारणामुळे व मार्क्सवादाच्या समजून घेण्याच्या तणावामुळे त्या काळात मागोवा ग्रुप विसर्जित करण्यात आला. तो १९७५ चा आणीबाणीचा काळ होता. त्यावेळी महाराष्ट्रातील वेगवेगळया भागात उदा. धुळे, शहादा, तळोदा, नंदुरबार, सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात मुंबईच्या कामगार, कष्टकरी चळवळीमध्ये, झोपडपट्टीमध्ये मागोवा मधील लोक कार्यरत होते. त्या चळवळीत अंबरनाथपासून गिरणगांवपर्यंत त्यांचा सहभाग होता. त्या चळवळी आणीबाणीमध्ये सुद्धा सुरु राहिल्या.

१९८० मध्ये श्रमिक मुक्ती दलाची स्थापना झाली. यामध्ये भारत पाटणकर, गेल ऑम्वेट (शलाका पाटणकर), भाऊ सोनावणे, हुमायुन मुरसल, संपत देसाई, धनाजी गुरव, अनंत कान्हेरे, रंजना कान्हेरे ;छळव्द्व अनिल सावंत, प्रमोद मुजुमदार, सतिश लोंढे यांचा समावेश होता. दरम्यानच्या काळात युरोप, अमेरिकेत ग्रीन मुव्हमेंट मोठ्या प्रमाणावर चालू होत्या आणि त्यामध्ये पर्यावरणाचा संबंध कसा शोषणमुक्तीशी आहे. पर्यावरण संतुलन आणि विकेंद्रित उत्पादन यांचा संबंध मानवी शोषणाशी आहे की नाही हा शोध घेण्याचा प्रयत्न चालू होता. त्यामध्ये श्रमुद सहभागी झाला आणि त्यातून त्यांनी पर्यावरण विचार मार्क्स, महात्मा फुलेंच्या विचारामध्ये शोधायला सुरुवात केली. फुल्यांच्या 'शेतकऱ्यांचा आसूड' ग्रंथात, व मार्क्सच्या 'दास कॅपिटल' ग्रंथात अशा काही गोष्टी दिसून आल्या की, हा जो भांडवलशाहीचा विकास आहे तो माणसाला, निसर्गाला व पर्यावरणाला उध्वस्त करणारा आहे. जर काही मुक्ती व्हायची झाली तर ती पर्यावरण संतुलित आणि विकेंद्रित समाजातूनच होऊ शकते. नाहीतर पुन्हा एकदा चीन, रशियात जो नोकरशाहीचा वर्ग सत्ताधारी झाला तसे होईल. म्हणून उत्पादनाची जी रचना आहे ती उतरंडीची असता कामा नये ती विकेंद्रित आणि पर्यावरण संतुलित असावी. अशा तऱ्हेने वर्गव्यवस्थेचा अंत, पर्यावरण संतुलित नवा विकेंद्रित समाज निर्माण होईल. अशा तऱ्हेचा विचार घेवूनच श्रमिक मुक्ती दलाची स्थापना झाली.

## ४. श्रमिक मुक्ती दलाची विचारसरणी —

श्रमिक मुक्ती दल ही एक नवसमाज निर्मितीची चळवळ असून शोषणविरहीत समाज निर्माण करणे हे या चळवळीचे अंतिम ध्येय आहे. मार्क्सची विचारसरणी हा मूळ पाया, महात्मा जोतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वैचारिक योगदान स्त्रीमुक्ती व पर्यावरणवादी चळवळीतील पुरोगामी प्रवाहांची सैधांतिक भर आणि लेनिन, रोझा लक्झेंबर्ग, ग्रामसी पासून दामोदर कोसंबीपर्यंतच्या अनेक विचारवंत आणि क्रांतिकारकांनी समृद्ध केलेली मूलभूत मांडणी या सर्वांतून तयार झालेले शास्त्रीय समाजवादी विचारांच्या आधारावर कार्यरत असणारा श्रमिक मुक्ती दल हा एक सर्वसमावेशक प्रवाह आहे. सन १९७२—७३ ला महाराष्ट्रात पुढे आलेला 'मागोवा गट' व त्यामधील कार्यकर्ते— अच्युत गोडबोले, सुधीर बडेकर, सुहास परांजपे, कुमार शिराळकर, विश्वास काकडे (डाव्या विचारसरणीचे) इत्यादींच्या विचारमंथनातून श्रमिक मुक्ती दलाची विचारसरणी तयार झाली पुढे १९८० ला डॉ. भारत पाटणकरांच्या नेतृत्वाखाली गेल ऑम्वेट

(शलाका पाटणकर), भाऊ सोनावणे, हुमायून मुरसल, संपत देसाई, कॉ. धनाजी गुरव, प्रमोद मुजुमदार, अनंत कान्हेरे यांनी श्रमिक मुक्ती दलाची स्थापना केली. आज श्रमिक मुक्ती दल चळवळीत मूलभूत बदल झालेले आहेत. पूर्णवेळ कार्यकर्ते हेच संघटनेचे नेते बनले आहेत. प्रस्थापित व्यवस्थेला मानवमुक्तीच्या समृद्ध, पर्यावरण संतुलीत आणि शोषणमुक्त व्यवस्थेला पर्याय देणारी, नवी दिशा घेणारी श्रमुद एक परिवर्तनवादी संघटना बनली.

सर्व प्रकारच्या पिळवणुकीपासून, दडपणुकीपासून मुक्त अशा चिरंतन विकासाची कास धरणारी, सुखी, समृद्ध समाज आणण्यासाठी क्रांती घडवण्याचे ध्येय ठेवून इतर समविचारी संघटनांशी आघाडी करुनच या ध्येयाकडे वाटचाल करणारी श्रमिक मुक्ती दल ही संघटना १९८० पासून भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली गेली ३८ वर्षे महाराष्ट्रात विशेषत: सातारा, सांगली, कोल्हापूर, पुणे, सोलापूर, रायगड, रत्नागिरी, लातूर, नंदुरबार, या जिल्ह्यांमध्ये चळवळीच्या माध्यमातून काम करीत आहे. शासनाला धोरणात्मक बदल घडवून आणण्यास भाग पाडणारी, "आधी पुनर्वसन मग धरण" हा धरणाच्या निर्मितीमध्ये चळवळीचा मुख्य हेतू आहे. धरण व पुनर्वसन ही कामे एकमेकांच्या हातात हात घालून झाली पाहीजेत त्यासाठी सातारा जिल्हयातील 'उरमोडी धरण – एक पॅटर्न' हा विचार श्रमुदने मांडला व त्यातूनच पुढे २००६ ला महाराष्ट्र राज्य पुनर्वसन प्राधीकरणाने शासनाची भूमिका म्हणून "आधी पुनर्वसन मग धरण" हा अधिनियम काढला तोच पुढे संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू झाला. एकुणच पाणी मिळेपर्यंत पाणीभत्ता, ज्या कुटुंबात मुलगा नाही तिथे स्त्री वारस, जमीन वाटप, पाणी धरणग्रस्तांना, लाभक्षेत्रातील लोकांना तसेच दुष्काळग्रस्तांना मिळवून देण्याची भूमिका 'श्रमुद' ची असल्याचे दिसून येते.

श्रमिक मुक्ती दलाचे धोरण म्हणजे कष्टकरी स्त्री–पुरुष जनतेची समांतर सत्ता प्रस्तापित करीत समग्र क्रांतिकारक परिवर्तनाकडे वाटचाल करणे हे आहे. त्याचबरोबर समान पाणी वाटप चळवळ आणि पर्यायी विकेंद्रित कृषी उद्योग निर्मिती, विस्थापितांचे व धरणग्रस्त, दुष्काळग्रस्तांचे प्रश्न, आदिवासी संस्कृती विकास आणि त्यांचा पाणी–जंगल–जमीन यांवरील हक्कांसाठी संघर्ष, साम्राज्यवादी सेझला जनतेच्या सेझचा पर्याय, पवनचक्कीग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठीचा लढा इ. उद्दिष्टये समोर ठेऊन श्रमिक मुक्ती दल कार्यरत आहे.

आजपर्यंत मांडल्या गेलेल्या शोषणमुक्तीच्या, क्रांतिच्या अनेक संकल्पनापेक्षा श्रमिक मुक्ती दलाची संकल्पना पूर्णपणे वेगळी आहे. गौतमबुद्धापासून ते मार्क्स, महात्मा फुले, डॉ. आंबेडकर यांच्यापर्यंत होऊन गेलेल्या सर्व समाजपरिवर्तनकारी महानुभवापर्यंत सर्वांच्या विचारामधील कालातित सिद्धांताचे एकसंध रसायन निर्माण होण्याच्या प्रक्रियेतून ही क्रांतिची कल्पना आकारलेली आहे. माणसाचे माणसाशी असणारे संबंध, माणसाचे उत्पादन साधनाशी असणारे संबंध, माणसाचे निसर्गाशी असणारे संबंध अशा सर्व क्षेत्रामध्ये मुळापासून समग्र बदल करणे हे या संकल्पनेमध्ये पायाभूत आहे.

प्रस्थापित शासनसंस्था संपवून कष्टकरी जनतेची शासनसंस्था हे श्रमुदच्या संकल्पनेत बसत नाही. तर सध्याची शासनसंस्था संपवून त्या ठिकाणी नव्या समाजाचे संयोजन विकेंद्रित पद्धतीने करणारी विकेंद्रित पर्यावरण संतुलित अशा कृषी–औद्योगिक केंद्राचे संयोजन करणारी आणि प्रत्येक व्यक्तीचा अनिर्बंध विकास हाच सर्व समाजाचा अनिर्बंध विकासाची पुर्वअट असणारी जनतेची नवी लोकशाही हाच क्रांतीचा पर्याय असेल आणि त्याची सुरुवात आजपासून "धोरणात्मक बदलासाठी जनतेची समांतर शक्ती" या राबणाऱ्या क्रांतिकारक प्रक्रियेतून होईल. अश्या पध्दतीची विचारसरणी श्रमिक मुक्ती दलाची आहे.

### ५. श्रमुदचा महाराष्ट्राच्या राजकारणावरील प्रभाव :–

महाराष्ट्राच्या राजकारणात सामाजिक चळवळींना अनन्य साधारण महत्व आहे. कारण चळवळींमुळे लोकशाहीत राजकारणाला गती दिली जाते. राजकारण चळवळीपासून कधी बाजूला झाले हे समजणे अवघड जाते. कारण राजकीय प्रक्रियेवर दृष्य चळवळीपेक्षा अदृष्य हितसंबंध हा जोर फार जोरदार व परिणामकारक असतो. महाराष्ट्र हे पुरोगामी विचारसरणी मानणारे राज्य आहे. या ठिकाणी ज्या वेगवेगळ्या चळवळी जन्माला आल्या त्यातून राजकीय नेतृत्व पुढे आलेले दिसते. उदा. सहकार चळवळ, दलित चळवळ, कामगार चळवळ इ. सामाजिक चळवळी आणि राजकारण यांचा जवळचा संबंध आहे. कारण ज्या सामाजिक प्रश्नासाठी संघटना काम करते त्या प्रश्नांची सोडवणूक ही शेवटी सत्तारुढ पक्षाला करावी

लागते. जरी सामाजिक चळवळ राजकारण विरहित काम करीत असली तरी तिचा संबंध हा सत्तारुढ पक्षाशी येत असतो. महाराष्ट्रात काम करीत असलेल्या श्रमिक मुक्ती दल चळवळीने राज्याच्या राजकारणात प्रवेश केला असला तरी तिचे संपूर्ण कार्य हे संसद बाहृ असे एका दबावगटाच्या स्वरुपात असल्याचे दिसून येते.

### अ. पाणी प्रश्न आणि राजकारण :—

महाराष्ट्राच्या राजकारणाचा एकूण जर विचार केला तर संपूर्ण राजकारण हे पाण्याभोवती फिरताना दिसते. महाराष्ट्रात लोकप्रतिनिधींचे पाणीप्रश्नांच्या माध्यमातून एकमेकांवर डावपेच चालताना दिसतात. त्याचे उदाहरन म्हणजे सांगली जिल्हृयतील वसंतदादा पाटील ज्यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळी त्यांनी सातारा जिल्हृयतील धुरंधर नेत्यावर डाव करुन सातारा जिल्हृयतील वाई तालुक्यातील धोम धरणाचे पाणी खटाव तालुक्यातून एक्सप्रेस कॅनॉल काढून सांगली जिल्ह्यातील दुष्काळी तालुक्यात नेले. त्यावेळी सातारा जिल्ह्यातील माण, खटाव हे पूर्ण व कोरेगांव, खंडाळा, फलटण अंशत: दुष्काळी होतेच व अजूनही आहेत. तेथील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही.

### ब. कृष्णा भीमा स्थैर्यीकरण व पाण्याचे राजकारण : —

कृष्णा—भीमा स्थैर्यीकरण प्रकल्पात सातारा जिल्हृयचे ५१ टी. एम. सी. पाण्याचा सर्वाधीक वाटा आहे. मात्र पाण्याचा लाभ मात्र नगण्य आहे. या प्रकल्पात ९५ टी. एम. सी. पाणीसाठा प्रस्तावीत आहे व सातारा जिल्हृयतील पूर्व भागात कायमस्वरुपी दुष्काळ असताना या प्रकल्पातून केवळ ०.७३: पाणी मिळणार आहे. शासनाने २००४ मध्ये वरील प्रकल्पास मंजूरी दिली आहे. पाणी मराठवाड्याकडे पळविण्याचा घाट आहे.

### क. श्रमिक मुक्ती दल एक दबावगट :—

भारत पाटणकरांनी कॉ. संपतराव पवार (बलवडी), कॉ. संपत देसाई (आजरा) यांना बरोबर घेऊन बळीराजा स्मृतीधरणाची चळवळ चालविली. महाराष्ट्रात बळीराजा हे शेतकऱ्यांच्या मालकीचं धरण व्हावं, पाण्यावर शेतकऱ्यांचाच अधिकार राहिल पण पाणी हे समन्यायी पद्धतीने त्याचे वाटप होईल असे धोरण ठरले. तेथून पुढे खऱ्या अर्थाने त्यांच्या कार्याला गती आली. सुरुवातीला त्यांनी शिवाजी विद्यापीठातील एन्. एस्. एस्. च्या मुलांचे सहकार्य घेतले. त्या भागातील युवकांचे, सामाजिक चळवळींचे सहकार्य घेतले. हे सगळे करत असताना त्यांनी — 'भारत ज्ञान — विज्ञान तथा समुदाय' या माध्यमातून त्या भागामध्ये मोठी रॅली काढली. वारा, जमिन, जंगल, पाणी या प्रश्नांवर चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला व वातावरण निर्मितीसाठी जनजागृती केली. त्यावेळी महाराष्ट्रात दुष्काळी वातावरण होते. महाराष्ट्रातील दुष्काळी तालुक्यातील लोकांचा पिण्याच्या पाण्याचा व शेतीच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. त्यामुळे क्रांतीवीर नागनाथआण्णांनी आपल्या सहकार्यांना बरोबर घेऊन 'पाणी संघर्ष चळवळ' सुरु केली. या चळवळीचा फायदा एवढा झाला की त्यामुळे दरवर्षी छत्रपती शाहूंच्या जयंती निमित्त आटपाडी या ठिकाणी पाणी परिषदा होतात. या परिषदांचा व श्रमिक मुक्ती दलाच्या माध्यमातून त्या त्या तालुक्यात भारत पाटणकर व त्यांच्या संघटनेला माणनारा एक राजकीय गट तयार झाला व त्यामुळे युतीच्या काळात (१९९५) सातारा, सांगली, सोलापूर जिल्हृयतील या १३ तालुक्यातून बरेचसे अपक्ष आमदार निवडूण आले व त्यांचा एक दबावगट तयार करुन कृष्णा खोरे विकास महामंडळाचे दुष्काळी भागासाठीचे काम गतीने करण्यास भाग पाडले. त्याचबरोबर त्यानंतरच्या विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समित्या इ. निवडणूकीत जर अपक्ष उमेदवार उभे राहिले तर त्यांना नगण्य नाही पण सायजेबल मते पडलेली आहेत. त्यांचा दबावगट हा उमेदवार विजयी करण्याच्या किंवा पराभूत करण्याच्या दृष्टीने त्या काळातही अस्तित्वात होता आणि आजही आहे. तसेच शेतकरी, कष्टकरी, दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त इ. मागण्या ते शासनाला मान्य करण्यास भाग पाडतात. एवढ्य प्रमाणात त्यांच्या दबावगटाचा प्रभाव दिसून येतो.

### ड. श्रमिक मुक्ती दल व निवडणुका :—

जगाला नटविण्याची, नवनिर्माणाची किमया करणाऱ्या, राबणाऱ्या जनतेच्या सामुदायीक नियंत्रणात चालणारा समृद्ध आणि निरोगी, पर्यावरणाला समृद्ध करणारा नवा समाज उभा करणे हे श्रमुदचे ध्येय आहे. हा समाज ही आम जनताच निर्माण करेल असा संघनेचा ठाम विश्वास आहे. हा समाज निर्माण करण्याच्या भूमिकेवर आधारेलला एक कार्यक्रम २००४ च्या निवडणूकीमध्ये श्रमुदने मांडला होता. या कार्यक्रमाच्या आणि मूळ भूमिकेच्या आधारावर चालणारी चळवळ पुढे न्यायची, निवडणूकात भाग घेऊन चळवळ निवडणूकांच्या रिंगणात उतरवायची असे श्रमुदचे धोरण आहे.

श्रमुदने ऑक्टोंबर २००९ च्या विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला निवडणूकीत मदत करण्याचे पुढील मुद्दयांवर ठरविले.

१) कृषी औद्योगिक सहकारी उद्योग उभारणे.
२) पर्यावरणाचा ऱ्हास न करणारे उद्योग उभारणे.
३) शेतकऱ्यांच्या चांगल्या जमिनी काढून न घेणे इ.

या विषयांवर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार व तत्कालिन प्रदेशाध्यक्ष आर. आर. पाटील यांचे समावेत बैठक होऊन वरील प्रश्नांची सोडवणूक करण्याचे मान्य करण्यात आले. पश्चिम महाराष्ट्रात श्रमिक मुक्ती दलाने विधानसभा निवडणूकीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसला केलेल्या मदतीमुळे या ठिकाणचे उमेदवार विजयी होण्यास मदत झालेली दिसून येते व महाराष्ट्रात वरील पक्षाची सत्ता प्रस्थापित झाली.

२०१४ च्या विधानसभा निवडणूकीत मात्र श्रमुदने जनतेला जाहीर आव्हान केले की, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना हे सर्वच पक्ष जनताविरोधी आणि भांडवलदारांच्या बाजूने धोरणे घेत आली आहेत. हे सर्व पक्ष एकाच माळेचे मणी आहेत म्हणून भांडवलशाहीचे शोषण संपविण्यासाठी जातीय उतरंडचे शोषण, स्त्रीयांचे शोषण, धर्म आणि जमातीच्या पायावरचे शोषण संपविण्यासाठी व जमिन, पाणी, जंगल, सूर्यप्रकाश, ध्वनीलहरी, प्रकाशलहरी इ. नैसर्गिक साधनसंपत्तीवर जनतेचे सामुहिक नियंत्रण आणण्यासाठी जनतेने आता नवे वादळ निर्माण केले पाहिजे. त्यामुळे सर्व प्रस्थापितांना नाकारणारे बटण ;छव्ज्।द्ध दाबून नकारात्मक मतदान करण्याचे ठरविण्यात आले. महाराष्ट्र राज्याच्या २०१४ च्या विधानसभेच्या निवडणूकीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर न जाता जो नकारात्मक मतदान करण्याचा श्रमुदने जो निर्णय घेतला त्याचा परिणाम हा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार पराभूत होण्यामध्ये काही अंशी झाला.

थोडक्यात स्थानिक, जिल्हा व राज्यपातळीवर जे राजकारण घडते आहे त्याचा प्रभाव सामाजिक चळवळीवर (संघटनेवर) पडताना दिसतो. कारण कोणत्याही राजकीय पक्षाला कोणतीही चळवळ नको असते. मात्र जे लोक सामाजिक चळवळीमध्ये काम करतात ते स्वभिमानी होतात. भारत पाटणकर यांच्या मते, आमच्या चळवळीतील कुठलाही माणूस इतरत्र जात नाही. कारण तो म्हणतो की, लोकप्रतिनिधी प्रशासकीय अधिकाऱ्यांना व नोकरशाहांना नीट बोलत नाहीत. मग आमच्याशी ते सरळ बोलतील का? चळवळीमुळे लोक संघटित होतात व त्यांच्यात एक प्रकारचा आत्मविश्वास येतो. राजकीय पक्षाकडून एक प्रकारचा दबाव संघटनेवर टाकला जातो, कारण संघटनेच्या सततच्या आंदोलनामुळे राजकीय पक्षाची खात्रीची मते जातात. सरकारी सत्ता ही बदलणारी आहे मात्र या व्यवस्थेत असणारी भांडवलशाही तशीच राहणार आहे. त्यामुळे शोषणही तसेच राहील त्यांना वाटते की चळवळीतील नेते आम्हाला पिन डाऊन करता कामा नये. आम्ही राजकीय क्षेत्रातील लोक आहोत, निर्णय प्रक्रिया आमच्या हातात आहे. कोणत्याही श्रमिक संघटनामध्ये जात—जमात वादामुळे फूट पडते व चळवळ कमकुवत बनते. त्यामुळे जात—जमातवादी माणसं सरकारमध्ये येता कामा नये असा चळवळीचा कटाक्ष असतो. त्यामुळे सत्तारुढ पक्षाच्या वतीने चळवळी कशा कमकुवत होतील यावर भर असतो.

### ६. सारांश :—

देशाचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, औद्योगिक क्षेत्रात विकास घडवून आणने ही शासनाची जबाबदारी असते. तो साध्य करीत असताना सगळ्याच घटकांना समान न्याय मिळेल याची खात्री देता येत नाही. मग जे घटक विस्थापित होतात किंवा सामाजिक विकासापासून वंचित राहतात त्या घटकांचे

प्रश्न ऐरणीवर आणण्याचे व ते शासनाकडून सोडवून घेण्याचे काम चळवळी करीत असतात. कारण सामाजिक चळवळी ह्या सामाजिक परिवर्तनाचे मुख्य उद्दिष्ट ठेऊन कार्यरत असतात.

या चळवळीमुळे निवडणुकांत फारसा बदल होत नाही. कारण चळवळीमध्ये समाविष्ट आसणारे जे लोक असतात ते चळवळीच्या विचारप्रणालीशी एकरुप झालेले असतातच असे नाही. ते त्यांच्याकडे प्रश्न म्हणून पाहत असतात तर संघटनेकडे प्रश्न सोडविणारी एजन्सी म्हणून पाहत असतात. आज श्रमिक मुक्ती दल जरी परिवर्तनाच्या कामात व्यस्थ असली तरी धरणग्रस्तांचे प्रश्न व इतर प्रश्न ज्यावेळी सुटतील त्यावेळी ही जनता संघटनेच्या पाठीमागे उभी राहील याची खात्री नाही. या संदर्भात श्रमुदचे म्हणने असे आहे की निवडणुकीत बदल होणे ही सोपी गोष्ट नाही पण ज्यावेळी आम्ही पर्यायी विकासनीतिची चळवळ प्रमुख बनवू त्यावेळी हा बदल होऊ शकतो. कारण निवडणुकांचे गणित वेगळे असते. त्यामध्ये जात, धर्म, पैसा वेगवेगळे हितसंबंध इ. गोष्टी असतात. मात्र तुमच्या हातात जर दबावगटाची चळवळ असेल तर ते राजकीय पक्षाशी चर्चा करुन मार्ग काढू शकतात. मात्र या चळवळीच्या दबावामुळे एखादा उमेदवार पडू शकतो एवढ्य प्रमाणावर बदल होऊ शकतो कारण निवडणुकीतील गुणात्मक बदल हा व्यापक भाग आहे. कारण तो एका विभागावर अवलंबून नसतो पण हा उमेदवारच नको या संदर्भात २००४ व २००९ च्या विधानसभा निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला व काँग्रेसला श्रमुदने पाठिंबा दिला. तुम्ही आमचे प्रश्न सोडविण्यासाठी लेखी हमी द्य मग आम्ही तुम्हाला मतदान करु. या ठिकाणी श्रमुद एक दबावगट म्हणून त्याचा राजकारणात निवडणुकांवर प्रभाव पडताना दिसतो. मात्र दरवेळी उपयोग होईल असे मात्र नाही. कारण निवडणुकांचे राजकारण करायला जी एक यंत्रणा असते ती चळवळीमुळे उभी राहतेच असे म्हणता येत नाही. कारण सर्वच लोक संघटनेचे ऐकतील असे नाही. कारण हे लोक त्यांचे प्रश्न सोडविण्यास संघटनेकडे आलेले असतात. मात्र त्याची धारणा, जगण्याचा विचार करण्याची पद्धती ह्य वेगवेगळ्य असतात.

थोडक्यात श्रमुद ही समाजवादी विचारसरणीची (संमिश्र) संघटना असल्याने श्रमिक कष्टकरी शेतकरी, शेतमजूर जनतेचे प्रश्न घेऊन त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लढताना दिसते. विस्थापनाचा प्रश्न, पवनचक्कीग्रस्त अथवा समान पाणी वाटपाचा लढा इ. प्रश्नात सामान्यांच्या प्रश्नाशी एकरुप होऊन त्यांची सोडवणूक करताना दिसते. तसेच धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाप्रश्नी पहिल्यांदा महाराष्ट्र राज्य शासनाला कायदा करण्यास भाग पाडले. २००५ चा समन्यायी वाटपाचाही कायदा संघटनेच्या संघर्षामुळेच झाला. तर देशातील मोठमोठ्य महाकाय धरणप्रकल्पामुळे पर्यावरणाची अतोनात हानी होते, जैवविविधता नष्ट होताना दिसते त्याचे परिणाम समस्त मानवजातीला भोगावे लागतात. परिणामत: अनेक दुर्घटना (पुणे जिल्ह्यतील माळीन दुर्घटना) प्रचंड वृक्षतोड झाल्याने राज्यात वारंवार पडणारा दुष्काळ हा त्याचाच दृष्य परिणाम आहे. अलिकडे सेझ, पवनचक्कीसारखे प्रकल्प, यासाठी जंगलतोड, वृक्षतोड मोठ्य प्रमाणात होताना दिसते. त्यामुळे जंगलावर उपजिविका करणाऱ्या आदिवासींचा प्रश्न गंभीर बनत आहे. त्याना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम श्रमुद करताना दिसून येते. थोडक्यात प्रस्थापित व्यवस्थेला मानवमुक्तीचा समृद्ध पर्यावरण संतुलित आणि शोषणमुक्त व्यवस्थेचा पर्याय देणारी संघटना म्हणून श्रमुद कार्यरत आहे. म्हणजे मानवमुक्तीच्या दिशेने सामाजिक परिवर्तन हीच भूमिका घेऊन लोकांचे होणारे शोषण, विस्थापितांवर होणारा अन्याय, मूळ गाववाले यांच्याकडून होणारा त्रास यातून मुक्त करण्याचे ध्येय समोर ठेवून संघटनेची वाटचाल सुरु आहे. संघटनेच्या लढ्यमुळे विस्थापितांच्या पुनर्वसनाचे अनेक कायदे झाले परंतु त्याची योग्य अंमलबजावणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे. लोकशाहीत संख्येला फार महत्व असते पण धरणग्रस्तांची संख्या तुलनेने कमी असल्याने व राजकारणातील निवडणुकांत त्याने फारसा फरक पडत नसल्याने त्यांच्या प्रश्नाकडे शासन पातळीवर दुर्लक्ष होताना दिसते. परंतु संघटनेच्या माध्यमातून चर्चा, आंदोलने, धरणे, मोर्चे इ. द्वारे शांततेच्या मार्गाने संघटना शासनाला पुनर्वसन कायदयाची अंमलबजावणी करण्यास भाग पाडताना दिसते. एकूणच विस्थापितांच्या सामाजिक समस्या सोडविण्यासाठी श्रमुदचे निश्चित असे धोरण आहे.

## ९. संदर्भसूची –

१) पाटणकर भारत, श्रमिक मुक्ती दल – मूलभूत व व्यावहारिक तत्वे, प्रकाशक – भारत पाटणकर कासेगांव, सांगली.

२) पाटणकर भारत — भूमिका आणि कार्यक्रम — ओमेगो प्रिंटर्स, बेळगाव.

३) पाटणकर भारत — श्रमिक मुक्ती दलाचा समांतर सत्तेचा कार्यक्रम, प्रकाशक : कॉ भारत पाटणकर.

४) पाटणकर भारत (संकलन) : श्रमिक मुक्ती दल मूलभूत भूमीकेचा जाहिरनामा, प्रकाशक — ॲड. कृष्णा पाटील, २००९.

५) पाटणकर भारत (शब्दांकन) — समन्यायी पाणी वापर धोरण, प्रकाशक, जयंत निकम कासेगाव, सांगली, १९९८.

६) म्हमाणे अनिल, संतोष गोटल (संपादक) — मानवमुक्तीसाठी समग्र : भारत पाटणकर खंड १, निर्मिती संवाद कोल्हापूर.

७) लेले जयंत — आजच्या काळासाठी नवीन सामाजिक चळवळीचा पुनर्विचार, समकालीन राज्यशास्त्र, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१२.

८) कांबळे उत्तम — (संपा.) श्रमिकांचे जग काल, आज आणि उद्या, सहा. लेखक,शिराळकर कुमार — श्रमिकांच्या चळवळी काल, आज आणि उद्य, लोकवाङमय गृह मुंबई, २०१२.

९) भुसारी निलकंठ — मानव अधिकार, विस्थापितांच्या व पर्यावरणाच्या समस्या, सहा. लेखक भोंगाडे विलास — गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांचा जीवनसंघर्ष फेब्रुवारी २०१२.

१०) संगवई संजय — समकालिन सत्याग्रही संघर्षाचे नवे रुप — नर्मदा खोऱ्यातील जनआंदोलन आशय व स्वरुप शि. वि. कोल्हापूर, २००४.

११) शहा घनश्याम — सामाजिक चळवळी आणि सरकार अनुवाद, योगिनी वेंगुर्लेकर, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००९.

१२) कुंभार सुरेश — श्रमिक मुक्ती दल — एक चिकित्सक राजकीय अभ्यास विशेष संदर्भ सातारा जिल्हा. एम्. फिल. अप्रकाशित शोधप्रबंध य. च. म. मु. वि. नाशिक २००९.